आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक भूमीपुत्राचा आज सन्मान व संवाद सोहळा

थेट अन् ग्रेट : भरतभेट ! कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

परळी वै. । प्रतिनिधी

तौरल इंडिया प्रायव्हेट. लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक भरत गित्ते या परळीच्या भूमीपुत्राचा आज १६ फेब्रुवारी रोजी सन्मान व संवाद सोहळा आयोजित करण्यात आला आहे. केवळ सन्मानच नाही तर थेट अन् ग्रेट : भरतभेट असे आगळेवेगळे या समारंभाचे स्वरूप आहे.या सोहळ्यास तमाम परळीकर नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

तौरल इंडिया प्रायव्हेट. लि. या कंपनीच्या माध्यमातून नावलौकिक प्राप्त केलेल्या भरत गित्ते यांच्याशी संवाद व त्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला असुन या सोहळ्याची जय्यत तयारीही करण्यात आली आहे. दावोस मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः गेले होते आणि भरघोस आंतरराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक महाराष्ट्रात आणली. महाराष्ट्रातीलच त्यातही परळीचा भूमीपुत्र असलेला उद्योजक भरत गित्ते यांनी एका आंतरराष्ट्रीय कंपनीचा प्रमुख म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबरोबर सामंजस्य करार केला. हा क्षण प्रत्येक परळीकरासाठी उर अभिमानाचा ठरला. परळीच्या मातीची खरी गुणशक्ती यानिमित्ताने अधोरेखित झाली.विविध क्षेत्रात कितीतरी असेच गुणी परळीकर आपापल्या क्षेत्रात कार्यकर्तृत्त्वाचा ठसा उमटवत आहेत. परळीच्या गुणशक्तीत अधिकाधिक वाढ व्हावी, अनेकांना प्रेरणा मिळावी यादृष्टीने आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक भरत गित्ते या परळीच्या भूमीपुत्राचा सन्मान करण्यात येणार आहे.त्याचबरोबर त्यांची प्रकट मुलाखतही घेतली जाणार आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर परळी वैजनाथ येथे आज रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वा. उद्योग जगतात तळपणार्या या परळीच्या ताऱ्याचा सन्मान होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्याशी आत्मिय संवाद साधून सर्वांसाठी प्रेरक होईल अशा पैलूंना उलगडून दाखवण्यासाठी उद्योजक भरत गित्ते यांची परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व लेखक- साहित्यिक प्रा.राजकुमार यल्लावाड हे प्रकट मुलाखत घेणार आहेत. या सोहळ्यास परळीकर म्हणून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक आपण सर्व परळीकर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी शेतीच्या योजनेसाठी फार्मर आयडी तयार करून घ्यावा

फार्मर आयडी कोठे काढाल – सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी हा ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सीएस, सीएस सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र व सर्व सेतू कार्यालय येथे खालील कागदपत्रे आधार कार्ड आधार लिंक मोबाइल क्रमांक सर्व सातबारा आठ अ उतारे लागणार आहेत.

किल्लेधारूर । प्रतिनिधी

केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी आधार कार्ड च्या धरतीवर फार्मर आयडी कार्ड तयार करण्याची योजना राबवली आहे. महसूल प्रशासन अग्रीस्टॉक योजनेच्या अंतर्गत गावोगावी बैठका घेऊन शेतकरी आयडी कार्ड तयार करत आहे. या कार्डद्वारे शेतकऱ्यांची एकूण जमीन घेतलेली पिके पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ, बँक पीक कर्ज माहिती आणि शेतीसंबंधी सर्व माहिती महत्त्वाची माहिती एका आयडी क्रमांक द्वारे उपलब्ध होणार आहेत. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील आणि कामकाजात पारदर्शकता निर्माण होईल व शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या शेती योजनेचा लाभ मिळणार असून तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा असे आवाहन धारूर तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. तहसील कार्यालयात याबाबत बैठक घेऊन सूचनाही करण्यात आले आहेत. यापुढे फार्मर आयडी नसल्यास भविष्यात यामुळे शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडचण येऊ शकतात दरम्यान शेती संदर्भात सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे तसेच पीएम किसन योजनेसाठी देखील शेतकरी ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे तरी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की याद्वारे भविष्यात केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घेता येईल. जर आपण आपला फार्मर आयडी शेतकरी ओळखपत्र बनविला नाही तर आपल्याला शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही त्यासाठी जवळच्या महा-ई-सेवा केंद्रावर जाऊन पुढील पंधरा दिवसात आपला सातबारा आधार लिंक करून घ्यावे व फार्मर आयडी शेतकरी ओळखपत्र बनून घ्यावी व यापुढे भविष्यात सर्व शेतकरी विषयक योजनांचा लाभ घ्यावा असे तहसील प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

'९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन' आणि 'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' 'दिलखुलास' कार्यक्रमात विशेष मुलाखतींचे प्रसारण

मुंबई । प्रतिनिधी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिल्यांदाच नवी दिल्ली येथे '९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे'. त्याअनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमातून '९८ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन' आणि 'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' दिनांक १७ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विशेष मुलाखतींचे प्रसारण आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात मुलाखतींचे प्रसारण: १) ९८ वे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच्या अध्यक्षा आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक प्रा. डॉ. तारा भवाळकर यांची 'अखिल भारतीय साहित्य संमेलनाची तयारी' या विषयावर मुलाखत सोमवार दि. १७, मंगळवार दि. १८ आणि बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसारित होणार आहे. ही मुलाखत निवेदक चिंतामणी सहस्रबुद्धे यांनी घेतली आहे. २) इतिहास अभ्यासक प्रा. इंद्रजीत सावंत यांची 'शिवकालीन मराठी भाषा' या विषयावरील मुलाखत गुरूवार दि. २० आणि शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसारित होणार आहे.

मांजरसुंबा गावचा सुपुत्र आकाश चौधरी यांची महसूल सहाय्यक पदी निवड

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील स्व.दिलीप चौधरी यांचे चिरंजीव आकाश चौधरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाली मांजरसुंबा गावातून पहिला अधिकारी होण्याचा मान आकाशने मिळवला असल्याने गावातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव व कौतुक होत आहे. आकाश चौधरी यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांनी स्वागत केले. स्पर्धा परीक्षा आणि

त्यासाठीची तयारी ही सामान्यतः कठीण आणि आव्हानात्मक असते. मात्र, अनेक अडचणींवर मात करून आकाश चौधरी याने यश संपादन केले व आपल्या वडिलांचं स्वप्न पूर्ण करत वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. या यशाबद्दल मांजरसुंबा गावासह संपूर्ण बीड जिल्ह्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तुकाराम महाराज म्हणतात तस शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे जिद्द, संघर्षाची तयारी आणि त्याला अभ्यासाची जोड असेल तर कुठल्याही परिस्थितीवर मात करता येते अनेक वर्षापासून शांतपणे केलेल्या अभ्यासाची ही सगळी फलश्रुती मिळाल्याची भावना व वडिलांचं स्वप्न पूर्ण केल्याने वडिलांच्या आठवणीने अश्रू अनावर होत सांगितले.

बीड : सौ.के.एस.के.(काकू) अन्नतंत्र आणि कृषी महाविद्यालय येथे संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी अभिवादन केले. यावेळी संस्थेचे सहसचिव गोविंद साळूंके, प्राचार्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

महालक्ष्मी सरसच्या रंगतदार सोहळ्यात मराठी सिनेसृष्टीचा तडका

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतील बीकेसी, वांद्रे पूर्व येथे महालक्ष्मी सरसमध्ये महाराष्ट्राच्या समृद्ध हस्तकला, चविष्ट पारंपरिक पदार्थ आणि ग्रामीण उद्योजकांच्या उत्कृष्ट उत्पादनांचा भव्य संगम पहायला मिळत आहे.

याच भव्य सोहळ्यात मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेत्रींची उपस्थिती विशेष आकर्षण ठरली. बांद्रा कुर्ला संकुल येथे ग्रामविकास व पंचायत राज विभाग अंतर्गत उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन - २०२५ चे आयोजन. दि. ११ ते २३ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे.मराठी सिनेसृष्टीतील सुपरस्टार अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि भार्गवी चिरमुले यांच्यासह हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री करिश्मा तन्ना यांनी महालक्ष्मी सरसला विशेष भेट दिली. त्यांनी नाविन्यपूर्ण स्टॉल्सना भेट देऊन ग्रामीण उद्योजकांशी संवाद साधला आणि गावाकडच्या चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला. ७ मार्च रोजी सर्वत्र प्रदर्शित होणाऱ्या गाव बोलावतो चित्रपटाचा दमदार टीझर महालक्ष्मी सरसच्या भव्य मंचावर लाँच करण्यात आला.

शेतकऱ्यांनी विविध योजनेसाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी काढून घ्यावे: शंकर झाडे

वडवणी । प्रतिनिधी

भारत कृषी अभियानांतर्गत भारत देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वतीने ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक योजना सुरू आहे. शेतकरी ओळखपत्र हे ॲग्री स्टॅक प्लॅटफॉर्म चा महत्त्वाचा भाग आहे. जो शेतकऱ्याची ओळख सुरक्षित करण्यात आणि त्यांना सरकारी सेवेचा लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. केंद्र शासनाने आधार कार्ड धरतीवर ग्रीस्टॅक फार्मर आयडी कार्ड योजना राबविली आहे. महसूल विभाग योजना ग्री स्टॅक योजनेच्या माध्यमातून कार्ड काढण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे सुरू आहे. हे प्रत्येक शेतकऱ्यास ग्रीस्टॅक फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) काढणे अनिवार्य आहे. हे कार्ड महा ई सेवा केंद्रात काढून घेणे.यापुढील काळात शेतकऱ्यांना पी.एम.किसान योजना,पीक विमा, नैसर्गिक आपत्ती अनुदान,पिक कर्ज,व इतर शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही.यांची नोंद घ्यावी .शेतकऱ्याची ओळख सुरक्षित करण्यात आणि त्यांना सरकारी सेवेचा लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. सदरील ओळखपत्र सर्व शेतकऱ्यांनी केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी काढणे आवश्यक आहे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) काढण्यासाठी आधार कार्ड, मोबाईल नंबर, तसेच शेतीचा गट नंबर, माहीत आवश्यक आहे.तरी सर्व शेतकरी बांधवानी लवकरात लवकर काढून घेणे असे आवाहन ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे यांनी केले आहे. शेतकरी ओळखपत्र ही आधार कार्ड अद्वितीय डिजिटल ओळखपत्र आहे जी राज्य भूमी अभिलेख प्रणालीशी सक्रिय जोडलेली आहे ओळख पत्र शेतकऱ्याच्या जमिनीच्या नोंदीमध्ये बदल झाल्यावर शेतकरी ओळखपत्र आपोआप अपडेट होईल

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी होणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात लिंबागणेशकर सहभागी होणार

लिंबागणेश । प्रतिनिधी

किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात दरवर्षी प्रमाणेच यावर्षी अंबेजोगाई शहरात सामुहिक उपवास,सहवेदना ,रॅली, व्याख्यान, पुरस्कार वितरण, आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा सन्मान सोहळा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन

करण्यात येणार असून या सर्व कार्यक्रमात शेकडो किसान पुत्रांनी सहभागी व्हावे असे आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब, संयोजक सुदर्शन रापतवार, कालिदास आपेट आदिंनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत किसान पुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या पुढाकाराने आज दि. १५ शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालया मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्राम पंचायत सदस्य दामोदर थोरात, समीर शेख, रमेश गायकवाड,प्रा. नितिन घोलप, पांडुरंग वाणी,संजय घोलप, आश्रुबा गिरे, विठ्ठल कदम, रामचंद्र मुळे, विनायक मोरे, संतोष भोसले,लहु घोलप, संजय पावले,जीवन मुळे,कचरू निर्मळ आदी उपस्थित होते.

किसान पुत्र आंदोलनाच्या वतीने देशभरातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते मा.अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने करण्यात येते. १९ मार्च रोजी साहेबराव करपे या शेतकऱ्याने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या विजेचे बिल भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून आपल्या कुटुंबासह सामूहिक आत्महत्या केली.

थोडक्यात

राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये संत सेवालाल महाराज जयंती निमित्ताने अभिवादन

किल्लेधारूर । प्रतिनिधी

शहरातील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये संत सेवालाल महाराज जयंती प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्ताने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार व सदस्य त्यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

श्री नारायण विद्यालयात संत सेवालाल जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात श्री संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून श्री नारायण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री महादेवराव काळे (अण्णा), संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर उपस्थित होते. प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे सर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवन कार्याविषयी बहुमोल अशी माहिती दिली. सूत्रसंचालन श्री चव्हाण युवराज सर यांनी केले आभार प्रदर्शन शेख सर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक प्राध्यापक श्री अशोक घरत सर श्री मस्के सर , श्री पौळ डी.बी, श्री करपे सर, श्री इनकर बी.जे, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर ,सौ. मस्के मॅडम, कदम एस .व्ही, पवार पी .एल, श्री मुरमुडे ए .एन , रकटे बी. आर , तसेच विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१८ फेब्रुवारी रोजी जवळा फकीर येथे पहिली बौद्ध धम्म परिषद : भदंत पय्यातीस महाथेरो

बीड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक भदंत पय्यातीस महाथेरो यांनी केले आहे. या धम्म परिषदेचे उद्धरटन १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे. तर धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, पूर्णा हे असणार आहेत. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर महाबोधी वंदना होईल. तर सकाळी ११ ते १२:३० यादरम्यान भिक्खू संघास भोजनदान आणि त्यानंतर दुपारी १ वाजता धम्मदेसनेस धम्म परिषदेस डॉ. प्रा. सत्यपाल सुरुवात होणार आहे.

लिंबारूई येथे गुरूवारपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई येथे शिवस्वरूप संत नारायणदेव बाबा वाकीकर यांच्या कृपाशिर्वादाने आणि शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० ते दि.२७ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी १ ते ४ संगीत भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकिर्तन होणार असुन यात ह.भ.प.गुरूवर्य महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क. १०१/२०२५ सत्यभामाबाई व ईतर १ वि. निरंक

ज्याअर्थी **मयत नामे तुकाराम पि.गोपीनाथ पौळ, मौजे रा. धोंडराई, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक ०६/०५/२०१० मौजे धोंडराई, ता. गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले.

अर्जदार :- १) सत्यभामाबाई भ्र तुकाराम पौळ, वय ७०, धंदा सुखवस्तु, रा. धोंडराई, ता. गेवराई, जि. बीड. २) संतोष पि.तुकाराम पीळ. वय ४३. धंदा शेती, गधोंडराई, ता गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वाग्य प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाच म्हण असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसांचे आत** त्याने या न्यायालयात हजर होतून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेतून ज्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नामे तुकाराम पि.गोपीनाथ पौळ, मौजे रा. धोंडराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक ०४/०२/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले. पुढील तारीख २६/०३/२०२५

(मार्फत – ॲड. ए. बी. पौळ, गेवराई)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

गेवराई शहरात सेवालाल महाराजांचा अर्धाकृती पुतळा उभारणार: आ. विजयसिंह पंडित

गेवराई शहरात संत सेवालाल महाराजांची जयंती उत्साहात साजरी

गेवराई । प्रतिनिधी

महामानव हे कोणत्याही एका जातीपुरते मर्यादित नसतात तर सर्व समाजातील दुर्बल, दुर्लक्षित घटकांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे विचार असतात. संत सेवालाल महाराज हे फक्त बंजारा समाजापुरते मर्यादित नाही तर सर्व समाजासाठी त्यांचे विचार प्रेरणा देणारे आहेत. यापुढील काळात शिवजन्म ोत्सव सोहळ्याप्रमाणेच संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्सव सोहळा सार्वजनिकरित्या सामाजिक उपक्रम घेऊन दरवर्षी साजरा करण्यात येईल आणि गेवराई शहरांमध्ये संत सेवालाल महाराजांच्या नावाचा चौक निश्चित करून त्या ठिकाणी संत सेवालाल महाराजांचा अर्धाकृती पुतळा उभारला जाईल असे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांनी दिले. संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन सोहळ्यात ते बोलत होते. संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पंडित यांच्या नेतृत्वाखाली दि.१५ फेब्रुवारी रोजी गेवराई शहरातील शास्त्री चौकात अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबुराव जाधव, उत्सव समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, जयंती उत्सव समितीचे उपाध्यक्ष रवी पवार, शितलताई साखरे, शेखर भुंबे, कमलेश वाघमारे, कार्याध्यक्ष सोमनाथ गिरगे, सचिव रहीम शेख, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

▶ संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त सायंकाळी पाच वाजता समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज पंडित यांच्या नेतृत्वाखाली गेवराई शहरातून सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संत सेवालाल जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

महादेव व हनुमान मंदीर कलश स्थापन कार्यक्रमास उपस्थित रहावे

चौसाळा । प्रतिनिधी

येथे होणाऱ्या महादेव व हनुमान मंदीर कलश रोहन कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित रहा असे आव्हान मंदिर व्यवस्थापण समिती कडून मुकुंद नवसेकर यांनी केले आहे.शनिवार दि.१५.०२.२०२५ रोजी सकाळी ९ ते १२ कलश व मुर्ती मिरवणुक संपन्न झाली.रविवार दि.१६.०२.२०२५ सकाळी ९ वाजल्यापासून गणेश पुजन, मात्रदा पुजन, आग्नीस्थापन, व होम हवन सोमवार दिनांक १७.०२.२०२५ सकाळी ०९.३० वा मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश रोहन कार्यक्रम संपन्न होईल. सोमवार दि. १७/०२/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ महंत गुरुवर्य ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे म ठाधिपती बंकटस्वामी संस्थान, निनगुर, पंढरपुर, आळंदी यांचे किर्तन होईल व नंतर सार्वजनिक महाप्रसाद होईल.

डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करतांना शाळेचे मुख्याध्यापक रोहिदास डोंगरदिवे, पवार साहेब तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनीं.

कृषी स्पंदन' या कला व क्रीडा सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात

बीड । प्रतिनिधी

कृषी विभागा अंतर्गत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व अधिनस्त उपविभागीय कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या 'कृषी स्पंदन' या कला व क्रीडा सांस्कृतिक म होत्सवा ची दि. १५.०२.२०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे जिल्हा कोषागार अधिकारी बीड श्री. लहु गळगुंडे यांच्या शुभहस्ते दिमाखात सुरुवात झाली.

सदर महोत्सव दोन दिवस होणार असुन त्यात क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, खोखो, बैडमिंटन, कॅरम, बुद्धीबळ इ. खेळांचा समावेश आहे तसेच कृषी अधिकारी कर्मचारी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम दि.१५.०२.२०२५ रोजी आर्या लॉन्स वर संपन्न झाला. त्यात कृषी कर्मचारी यांच्या विविध कलागुणांचा अविष्कार दिसून आला. क्रीडा महोत्सवाचे शुभारंभाचे प्रास्ताविक श्री.सुभाष साळवे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बीड यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात श्री. साळवे यांनी कृषी विभागाच्या

विविध योजनां द्वारे शेतक-यांच्या उन्नतीसाठी कर्मचान्यांचे योगदान विषद केले व सांघिक खेळाचे महत्त्व सांगितले. तसेच प्रमुख पाहुणे श्री लहु गळगुंडे, जिल्हा कोषागार अधिकारी बीड यांनी क्रीडा संस्कृतीचे महत्व सांगितले. या प्रसंगी अधिकारी कर्मचारी यांनी शानदार पथसंचलन केले त्यात महात्मा फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण योगदान, कृषी योजना, वासुदेव, वारकरी मेळा, महाशिवरात्र प्रसंग इ. सादरीकरण केले. त्यामध्ये तालुका कृषी अधिकारी अंबाजोगाई यांनी समृध्द महाराष्ट्र, उपविभागीय कृषी अधिकारी माजलगाव यांनी जागर शेतीचा, तालुका कृषी अधिकारी गेवराई यांनी कृषी विभाग शेतकऱ्याच्या सेवार्थ, तालुका कृषी अधिकारी आष्टी यांनी बदलती कृषी पद्धती, तालुका कृषी अधिकारी शिरूर यांनी दक्षीण भारतीय वेषभूषा, सादरीकरण केले.

आत्महत्या प्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर : ॲड. तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

घटनेची हकीगत अशी की, वाहन चालक ज्ञानेश्वर महानोर हे मामा उगले रा. केज यांच्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करत होते, त्या आयशर टेम्पोवर ड्रायव्हर म्हणून काम करत असताना दि. ०९/०८ /२०२४ रोजी त्या टेम्पोचा अपघात झाला होता. तो अपघात झाल्या प्रकरणी टेम्पोचे नुकसान भरपाई म्हणून नाना उगले हे मयत ज्ञानेश्वर यांना नुकसान भरपाई म्हणून दोन लाख रुपयांची मागणी करत होते व दिनांक २० /८ /२०२४ रोजी नाना उगले यांनी संबंधित फिर्यादी व मयत यांना मारहाण करून दुकानात दाबून ठेवले होते. त्यामुळे ज्ञानेश्वर याने बाग पिंपळगाव येथे राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. नाना उगले यांच्या त्रासाला कंटाळून ज्ञानेश्वर याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी शिवप्रेमी शिवजन्मोत्सव समितीच्या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहा: प्रा. सत्येंद्र पाटील

बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवप्रेमी प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वतीने शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या शिवजन्मोत्सवाच्या आयोजन आणि नियोजनाच्या निमित्ताने आज दि.१६ फेब्रुवारी रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरि या बैठकीस बीड शहरातील शिवप्रेमी प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी शिवप्रेमी शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील सर यांनी केले. बीड शहरात मागील काही वर्षांपासून शिवप्रेमी प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वतीने छत्रपती शिवाजी म हाराज यांचा जन्मोत्सव आगळ्या वेगळ्या पद्धतीने, विविध उपक्रम ाने, व्याख्यान आणि प्रबोधनात्म क कार्यक्रमाने साजरा केला जातो. रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता स्वराज्य नगर भागातील रवींद्र किराणाच्या पाठीमागे अमोल गलधर चौक येथील प्रा. पाटील यांच्या निवासस्थानी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मौजे ईट येथे श्री. संत सेवालाल जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ईट येथे उत्साहात सारी करण्यात आली. यावेळ शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

वादग्रस्त विधान करणाऱ्या राहूल सोलापूरकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी ; एसएफआयच्या वतीने दिले वडवणीत निवेदन

वडवणी । प्रतिनिधी

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल वादग्रस्त विधान करणाऱ्या राहूल सोलापूरकर याचा स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) तीव्र निषेध करत असून राहूल सोलापूरकर याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी एसएफआयच्या वतीन वडवणी तहसील कार्यलय येथे निवेदनाद्वारे करण्यात आली. अशा बेताल वक्तव्य करणाऱ्या सोलापूरकर याच्यावर कडक कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी एफएसआयने वडवणी तहसील कार्यालय येथे निवेदनाद्वारे केली. यावेळी एसएफआयचे तालुकाध्यक्ष करण साळवे, तालुका सचिव अभिषेक अडागळे, उपाध्यक्ष करण भिसे, प्रदिप गलांडे, करण लोंढे, रुकम गत अजरट आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला याला महत्व: ह.भ.प.महारुद्र महाराज खाडे

▶ होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

केज । प्रतिनिधी

कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकीय क्षेत्रातील सुपरिचित व्यक्तिमत्व मधुकर खाडे महाराज हे अल्पकाळ जगले. माणूस किती जगला, यापेक्षा कसा जगला, याला अधिक महत्व आहे, असे मत अंबाजोगाई तालुक्यातील उमराई येथील शिवगड संस्थानचे संस्थापक ह.भ.प. महारुद्र महाराज खाडे शास्त्री यांनी व्यक्त केले. वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे.

महसूल सहाय्यक पदासाठी निवड झालेल्या प्राजक्ता तांगडे यांचा ढेकणमोहा येथे सत्कार

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बोरदेवी येथील शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता रामेश्वर तांगडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) परीक्षेत यश संपादन करून महसूल सहाय्यक अधिकारी पदासाठी निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी ढेकणमोहा येथील पसायदान सेवा प्रकल्प येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात प्राजक्ता तांगडे यांना शुभेच्छा देताना पसायदान सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे व संचालिका रंजना गोवर्धन दराडे यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ बीड युवा अध्यक्ष सुभाषराव तांगडे, ढेकणमोहा माजी सरपंच नागेश शिंदे, राहुल कांबळे, प्राजक्ताचे वडील रामेश्वर तांगडे, सखाराम शिंदे, भानुदास तांगडे, परमेश्वर तांगडे, पवन दराडे, रोहन दराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राजक्ता तांगडे यांच्या यशाने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्या भविष्यात अधिक उत्तुंग भरारी घेतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयात नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण, जलसंधारण विषयी कार्यशाळा

युनीसेफ़ चे जिल्हा समन्वयक राहूल गिरी यांच्याकडून २०० विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे धडे

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नैसर्गिक संसाधनाच्या संरक्षण विषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत युनीसेफ़ चे जिल्हा समन्वयक राहूल गिरी यांनी विद्यार्थ्यांना पाणी बचतीची वेगवेगळे फायदे, कोणकोणत्या पद्धतीत आपण पाणी वाचवू शकतो. व्हाय वेस्ट या पच्या माध्यमातून मिळणारे प्रमाणपत्र व त्याचा आपल्या भविष्यासाठी लागणारा उपयोग. तसेच युनिस्को च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्यातलं असणार ज्ञान प्रदर्शित करण्यासाठी मि ळणाऱ्या विविध राज्यस्तरीय आंतरराज्य संधी. पाणी बचत केल्यामुळे होणारे फायदे व आपल्यामध्ये होणारा बदल. याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. शुक्रवार ७ फेब्रुवारी आयोजित कार्यशाळेला महाविद्यालयातील २०० विद्यार्थी, विद्यार्थीनी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात पाणी बचतीचे महत्व कळावे, त्यांना पाणी बचतीसंदर्भात सवय लागावी यासाठी आदित्य पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि जलसंधारण हे अभियान राबवण्यात आले.